सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११
विस्तारीत क्र. ७०४
ई-मेल – desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in

कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना/भरती कामकाज),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पोलीस आयुक्त कार्यालय, डी.एन.रोड, बृहन्मुंबई ४०० ००१

जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/616 /२०२४, दि. 21 /०३/२०२४.

# नियुक्ती सुचना क्र.११

# मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती - २०२१

**विषय :- मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२१
पोलीस शिपाई (चालक) पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत.**

**संदर्भ :- जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१५५६/२०२३, दि. २५/०९/२०२३.**

उपरोक्त संदर्भानूसार मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदाची अंतिम निवड यादी कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनूसार प्रसिध्द करण्यात आली आहे. मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती - २०२१ प्रक्रियेतील अंतिम निवड यादीत समावेश झालेल्या उमदेवारांची नियुक्ती देण्याची कार्यवाही करणेपुर्वी उमेदवारांची वैद्यकीय चाचणी करणे, तसेच ज्या उमदेवारांच्या वैद्यकीय चाचणीस ०६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ नुसार पुन्हा वैद्यकीय चाचणी घेणे आवश्यक आहे.

**यास्तव सोबतच्या यादीतील ११ उमेदवारांनी वैद्यकीय चाचणीकरीता दि.२७/०३/२०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, भायखळा, मुंबई-४००००८ येथे हजर रहावे. त्याचप्रमाणे जे उमेदवार सदर वैद्यकिय तपासणीमध्ये पात्र ठरतील अशाच उमेदवारांना त्याचदिवशी नियुक्ती आदेश देण्यात येतील, त्यामुळे सर्व उमेदवारांनी प्रशिक्षणास जाण्याच्या सर्व तयारीनिशी हजर रहावे.**

उमेदवारांना नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलाविण्यात आले म्हणुन नियुक्तीचा प्राधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये. भरती प्रक्रीयेतील कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच खाली नमूद केलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

**नियुक्तीसाठी येताना न चुकता सोबत आणावयाच्या आवश्यक बाबी :-**

१) भरती ओळखपत्र (मैदानी चाचणी/ लेखी परिक्षेचे)

२) ०४ पासपोर्ट साईज फोटो.

३) आधार कार्ड व पॅन कार्ड.

४) दैनंदिन गरजेच्या वस्तू घेऊन पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

५) आवेदन अर्जामध्ये नमूद केलेली मुळ कागदपत्रे - (सामाजिक/समांतर आरक्षण सिध्द करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेली प्रमाणपत्रे, वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हता, अधिवास प्रमाणपत्र/रहिवास दाखला, एम.एस.सी.आय.टी. व इतर)

६) शासनाने वेळोवेळी विहीत केलेले लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र, संगणक हाताळणी, नियुक्ती पुर्वीचे हमीपत्र, जन्म तारखेचे हमीपत्र नमुना सोबत जोडला असुन तो सुवाच्छ स्वाक्षरात सोबत भरुन आणावेत.

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषांकरिता), २ खाकी हाफ पॅन्ट, २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, २ ट्राऊझर (महिलांकरिता), २ पांढरे टी-शर्ट इ. साहित्य सोबत आणावे. सोबत "मेस ॲडव्हान्स ₹. २,०००/- घेऊन यावे."

तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इ. वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**विशेष सुचना :-**

१. भरती आवेदन पत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई (चालक) पदाची अस्थायी नियुक्ती ही नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२. नियुक्तीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवाराने भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळुन आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही, अथवा नियुक्तीनंतर पात्रते विषयी त्रुटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

(नवनाथ ढवळे)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) तथा
सदस्य सचिव, मुंबई पोलीस शिपाई भरती-२०२१

पोलीस आयुक्त मुंबई

# शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना दि. २८ मार्च २००५

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५**
**नमुना अ (नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती. ………………………………………………, बैठक क्र. ………………………, छाती क्र. ……………, श्री. ……………………………………………………… यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय. ………… वर्षे, राहणार ……………………………………………………… …………………………… याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

१. मी पोलीस शिपाई (चालक) या पदासाठी अर्ज दाखल केला असुन सदर पदावर माझी तात्पुरती निवड झाली आहे.

२. मी विवाहीत असुन आज दि. / /२० रोजी मला ……… (संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या …………… आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००६ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

| अ.क्र. | मुलांची नांवे | जन्मदिनांक | वय |
|---|---|---|---|
| १. | ……………………………………… | दि. / / | …………वर्षे |
| २. | ……………………………………… | दि. / / | …………वर्षे |

ठिकाण :

दिनांक :

( ………………………… )
उमेदवाराचे नांव, सही व दिनांक

**महत्वाच्या तरतुदी :-**

१. लहान कुटुंब याचा अर्थ दोन मुले यासह पत्नी व पती असा आहे.
२. एखाद्या जोडप्यास हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकाला म्हणजेच दि. २८ मार्च २००५ ला किंवा त्यानंतर केवळ एकच मुल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसुतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणुन समजण्यात येईल.
३. हे नियम अंमलात येणाच्या दिनांकास (दि. २८ मार्च २००५) दोनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या व्यक्तीस, अशा अंमलबजावणीच्या दिनांकास (दि. २८ मार्च २००५ असलैल्या तिच्या मुलांच्या संख्येत जोपर्यंत वाढ होत नाही. तोपर्यंत या खंडाखाली, नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येणार नाही. परंतु आणखी असे की, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासुन (दि. २८ मार्च २००५) एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्मलेले मुल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही.
४. वर नमूद टंकलिखित मजकुर मी स्वत: वाचला असून मी आज दि. / /२० रोजी हे हमीपत्र स्वत: देत आहे.

**-: साक्षीदार :-**

| | नांव | पत्ता | सही / दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ……………………………… | ………………………………… | ………………………. |

## मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०२१ प्रक्रियेंतर्गत उमेदवारांनी द्यावयाचे हमीपत्र (UNDERTAKING)

---

मी श्री./श्रीमती. ……………………………………………………, बैठक क्र. ……………………… याद्वारे खालीलप्रमाणे हमीपत्र लिहुन देतो/देते आहे.

१. मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०२१ प्रक्रियेंतर्गत माझी ……………………… या मागास प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदासाठी निवड झाली असुन शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील निर्देशानुसार माझ्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहुन माझी वर नमूद पदावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.

२. वर नमूद शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ०६ महिन्यांच्या आत, जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक असल्याची बाब नियुक्ती अधिकाऱ्यांनी मला समक्ष सांगितली आहे. यास्तव मी याद्वारे अशी लेखी हमी देत आहे की, पोलीस शिपाई (चालक) पदावरील नियुक्ती स्विकारताच माझ्या जातीची वैधता तपासण्यासाठी त्याबाबतचा प्रस्ताव मी संबंधीत जात पडताळणी समितीकडे तात्काळ सादर करुन जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत मा. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२), मुंबई (कक्ष-९, कनिष्ठ आस्थापना) यांच्याकडे तात्काळ सादर करीन.

३. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश माझ्यावर बंधनकारक राहतील याची मला जाणीव आहे.

४. जात पडताळणी समितीने माझे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास, मला दिलेल्या नियुक्तीचे आदेश रद्द होवुन माझ्याविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई होण्यास मी पात्र ठरेन याची मला समक्ष माहिती देण्यात आली आहे.

५. वर नमूद टंकलिखित मजकूर मी स्वत: वाचला असुन मी आज दि.     /     /२०     रोजी हे हमीपत्र स्वत: देत आहे.

-: साक्षीदार :-

| | नांव | पत्ता | सही / दिनांक |
|---|---|---|---|
| ३. | ……………………………… | ……………………………… | ……………………… |
| ४. | ……………………………… | ……………………………… | ……………………… |

( ……………………… )

उमेदवाराचे नांव, सही व दिनांक

# संगणक हाताळणी व वापर करण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणेबाबतचे हमीपत्र

मी श्री./श्रीमती. ·····················································, बैठक क्र. ............................, शपथपूर्वक याद्वारे पूर्ण समजूतीने व स्वखुषीने सदरहू बंधपत्र/ हमीपत्र लिहून देत आहे.

पोलीस शिपाई (चालक) पदासाठी अर्ज सादर केला होता. सदर पोलीस भरतीबाबतचे नियम, निकष, भरती अटी व शर्ती याबाबतच्या पुर्ततेच्या अधीन राहुन सादर केला होता याची मला पूर्ण जाणीव आहे. भरती बाबतच्या अटी व शर्तीची मी पूर्तता न केल्यास माझी उमेदवार/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व सरदहू कारवाई माझ्यावर बंधनकार राहील याबाबत मला पूर्ण जाणीव आहे. मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०२१ प्रक्रियेंतर्गत कागदपत्र पडताळणी पात्रता, कागदपत्रांची पूर्तता, भरती निकषांची पूर्तता यांच्या अधीन राहून माझी तात्पूरती निवड ························ प्रवर्गातुन निवड करण्यात आलेली आहे. सदरहू माझी निवड पूर्णपणे तात्पुरती आहे याची मला जाणीव आहे.

महाराष्ट्र पोलीस शिपाई (चालक) सेवाप्रवेश नियम-२०१९ मधील नियम १३ ते १६ नुसार पोलीस शिपाई (चालक) पदावर नियुक्ती झाल्याने शासनाने विहित केलेल्या कालावधीत शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या नंतर दोन वर्षांच्या आत धारण करणे आवश्यक आहे. जर विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल, याची मला जाणीव आहे. व त्याबाबत मी कोणताही दावा, तक्रार करणार नाही. तसेच विहित कालावधीत प्राप्त करणे मला बंधनकारक आहे.

तसेच मी घोषित करतो/करते की, सदरहू नियमातील तरतुदींची पुर्तता माझ्याकडून न झाल्यास माझी निवड अथवा नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व सदरहू कारवाई माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

उक्त बंधपत्र/हमीपत्र प्रतिज्ञापूर्वक आणि पूर्ण समजुतीने दि.      /      /२०२४   रोजी मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०२१ प्रक्रियेंतर्गत लिहून दिलेले आहे व यामध्ये नमुद केलेल्या बाबी/मजकूर मला कायमस्वरुपी बंधनकारक आहेत.

उमेदवाराची सही : ..........................

पूर्ण नांव: ·································

छाती क्र.      : ..........................

बैठक क्र.      : ..........................

ठिकाण : ·····················

दिनांक :     /     /२०२४

# अधिसुचना

महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-४- गुरुवार ते बुधवार, दि. ३०, २०२१-जानेवारी ५, २०२२/ पौष ९-१५, शके १९४३

# वित्त विभाग

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ३० डिसेंबर २०२१**

**परिशिष्ट- पाच अ**

**नियम ३८ (२) (ए) पहा**

## हमीपत्र

शासकीय अभिलेखात माझ्या जन्मतारखेची नोंद करण्यासाठी मी, ……………………………, मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०२१ च्या प्रक्रियेमध्ये ……………………………… ही कागदपत्रे सादर केलेली आहेत. आणि माझ्या माहितीनुसार सेवापुस्तकात नोंद केलेली तारीख म्हणजेच दि. / / . (अक्षरी ……………………………………) ही तारीख अचुक आहे आणि माझी जन्मतारीख नोंदविल्यानंतर, जन्मतारखेत बदल करण्याची विनंती त्यानंतर स्विकारली जाणार नाही याची देखील मला जाणीव आहे.

( …………………………………… )
शासकीय कर्मचाऱ्याची सही

ठिकाण : ……………

दिनांक : / /२०२४

| MUMBAI POLICE CONSTABLE (DRIVER) RECRUITMENT - 2021<br>(SHEDULED FOR MEDICAL EXAMINATION OF CANDIDATES) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **SR NO.** | **APPLICATION NO** | **NAME** | **GENDER** | **DOB** | **APPLIED CASTE** | **APPLIED CATEGORY** | **TOTAL MARKS** | **SELECTION CASTE** | **SELECTION CATEGORY** | **DATE** | **TIME** |
| 1 | 110601000004317 | PRAVIN VILAS PATIL | M | 16-05-1984 | Open | Ex Service | 143 | Open | Ex Service | 27-03-2024 | 08.00 AM |
| 2 | 110601000031188 | PRUTHVIRAJ VIKRAM PAWAR | M | 26-01-1996 | VJ(A)/DT (A) | Project Affected | 141 | Open | Project Affected | 27-03-2024 | 08.00 AM |
| 3 | 110601000116287 | SHRIRAM BHIMRAO DHANDE | M | 17-07-1996 | EWS | None | 141 | Open | General | 27-03-2024 | 08.00 AM |
| 4 | 110601000087493 | LAXMAN KISAN GIRI | M | 14-04-1995 | NT(B) | HomeGuard | 139 | NT(B) | HomeGuard | 27-03-2024 | 08.00 AM |
| 5 | 110601000018330 | KISHOR MADHUKAR ZAREKAR | M | 05-09-1999 | EWS | Project Affected | 139 | Open | Project Affected | 27-03-2024 | 08.00 AM |
| 6 | 110601000023074 | DINKAR SHANTARAM BAMBALE | M | 01-08-1996 | ST | HomeGuard | 137 | ST | HomeGuard | 27-03-2024 | 08.00 AM |
| 7 | 110601000038143 | PAVAN MAROTRAO SHINDE | M | 05-03-1997 | EWS | Project Affected | 137 | EWS | Project Affected | 27-03-2024 | 08.00 AM |
| 8 | 110601000007006 | RAJENDRA GOVINDA HIRE | M | 01-06-1980 | OBC | Ex Service | 136 | Open | Ex Service | 27-03-2024 | 08.00 AM |
| 9 | 110601000010309 | MANOHAR HANMANT PHALKE | M | 18-07-1981 | EWS | Ex Service | 136 | Open | Ex Service | 27-03-2024 | 08.00 AM |
| 10 | 110601000035909 | RAM BABURAV LANDAGE | M | 09-05-1994 | NT(C) | Earthquake Affected | 136 | Open | Earthquake Affected | 27-03-2024 | 08.00 AM |
| 11 | 220601000004325 | RUPALI RAJENDRA JANGLE | F | 29-04-2000 | EWS | None | 126 | Open | Female | 27-03-2024 | 08.00 AM |